**सर्व शिक्षण मोहीम (सर्व शिक्षा अभियान )**
**कार्यक्रमाची राज्यामध्ये अंमलबजावणी करणे.**

**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण विभाग**
**शासन निर्णय क्रमांक पीआरई २०००/(२७४०)/प्राशि-१**
**मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२**
**दिनांक : १८ जानेवारी,२००२.**

**पार्श्वभूमी :-** अनेक वर्षापासून जोपासलेले प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी केंद्रशासनाने सर्व शिक्षा अभियान हा कार्यक्रम सुरु केलेला आहे. विशिष्ट कालावधीत एकात्म पध्दतीने, राज्याच्या भागीदारीने हा कार्यक्रम अंमलात येत आहे. तसेच ६ ते १४ वर्ष वयोगटातील सर्व मुला-मुलींना इ.सन २०१० पर्यंत जीवनावश्यक व गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्याची ग्वाही सर्व शिक्षण मोहीमेत देण्यात आलेली आहे.

**शासन निर्णय :-** प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण करुन सर्व शिक्षण मोहीमेअंतर्गत केंद्र शासनाने विहीत केलेली उद्दिष्टये राज्याच्या संदर्भात पूर्ण करण्याच्या दृष्टीने राज्यामध्ये सर्व शिक्षण अभियान कार्यक्रम अंमलात आणण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

**सर्व शिक्षण मोहीमेची उद्दिष्टये :**

१) सन २००३ पर्यंत सर्व मुले-मुली शाळा, शिक्षण हमी केंद्र, पर्यायी शिक्षण केंद्र इत्यादीमध्ये दाखल करणे.

२) सन २००७ पर्यंत सर्व मुला-मुलींचे पाच वर्षाचे प्राथमिक शिक्षण पूर्ण करणे,

३) सन २०१० पर्यंत सर्व मुला-मुलींचे आठ वर्षाचे शालेय शिक्षण पूर्ण करणे

४) प्राथमिक शिक्षणाच्या समाधानकारक दर्जा व जीवनोपयोगी शिक्षणावर भर,

५) प्राथमिक स्तरावरील लिंगभेद व सामाजिक क्षेत्रातील फरक २००७ पर्यत दूर करणे व उच्च प्राथमिक शिक्षणाबाबत हेच उद्दिष्ट २०१० पर्यंत साध्य करणे

६) इ.स.२०१० पर्यंत १०० टक्के उपस्थितीचे उद्दिष्ट साध्य करणे.

**सर्व शिक्षण मोहिमेचे उपक्रम / घटक :**

सर्व शिक्षण मोहिमेमध्ये पुढील उपक्रमांचा/घटकांचा समावेश आहे :-

१) शिक्षकांची नियुक्ती.

२) शाळा/पर्यायी शाळांची सुविधा.

३) वरिष्ठ प्राथमिक शाळा.

४) वर्गखोल्या बांधकामे.

५) मोफत पाठ्यपुस्तके.

६) नागरी बांधकामे. (सिव्हील वर्क्स)

७) शाळा इमारतींची देखभाल व दुरुस्ती.

८) शिक्षण हमी योजनेअंतर्गत केंद्रांचे नियमित शाळांमध्ये उच्चीकरण.

९) वरिष्ठ प्राथमिक शाळांना अध्ययन व अध्यापन साहित्य पुरविणे.

१०) शाळा अनुदान.

११) शिक्षक अनुदान.

१२) शिक्षक प्रशिक्षण.

१३) राज्य शैक्षणिक व्यवस्थापन, प्रशासन आणि प्रशिक्षण संस्थेची स्थापना.

१४) समुदायातील नेतृत्त्व प्रशिक्षण.

१५) अपंग मुलांच्या शिक्षणाची सोय.

१६) संशोधन, मूल्यमापन, पर्यवेक्षण आणि सनियंत्रण.

१७) व्यवस्थापन खर्च.

१८) मुलींच्या शिक्षणासाठी नवोपक्रम, बालशिक्षण, संगोपन आणि अनुसूचित जातीजमातीतील समुदायातील मुलांसाठी विशेष उपक्रम.

१९) उच्च प्राथमिक वर्गातील मुलांना संगणक प्रशिक्षण.

२०) तालुका साधन केंद्र/गट साधन केंद्र.

२१) शाळाबाहय मुलांचे शिक्षण.

२२) सुक्ष्म नियोजनासाठी पूर्वतयारी, प्रत्येक घराचे सर्वेक्षण, अभ्यास, शालेय उपक्रम, कार्यालयीन साधने इत्यादी.

सर्व शिक्षण मोहिमेअंतर्गत समाविष्ट असलेले उपक्रम संबंधित जिल्हयात आवश्यक असल्यास केंद्र शासनाने मंजूर केलेल्या प्रकल्प आराखड्यानुसार व त्यासाठी विहीत असलेल्या निकषानुसार अंमलात आणण्यात येतील.

२. सर्व शिक्षण अभियान कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी केंद्र शासनाने विहित केलेल्या पुढील आर्थिक निकषास शासनाची मान्यता देण्यात येत आहे. :-

अ) सर्व शिक्षण मोहिमेसाठी केंद्र व राज्य शासनाचे आर्थिक सहाय्य पुढीलप्रमाणे राहील-

| | केंद्र शासन | राज्य शासन |
|---|---|---|
| ९ वी पंचवार्षिक योजना | ८५ % | १५ % |
| १० वी पंचवार्षिक योजना | ७५ % | २५ % |
| १० व्या पंचवार्षिक योजनेनंतर | ५० % | ५० % |

ब) प्राथमिक शिक्षणासाठी वरील तरतुदीसाठी राज्याचा वाटा निर्धारित करण्यासाठी १९९९-२००० हे मुलभूत वर्ष धरले जाईल.

क) सर्व शिक्षण मोहिमेसाठी राज्य शासनाची तरतुद ही १९९९-२००० या मुलभूत वर्षाच्या तरतुदीव्यतिरिक्त राहील.

ड) सर्व शिक्षण मोहिमेसाठी केंद्र शासन त्यांच्या हिश्श्याची रक्कम राज्याच्या एकत्रित निधीमध्ये जमा करील. सर्व शिक्षण मोहिमेच्या अंमलबजावणीसाठी स्थापन केलेल्या संस्थेकडे ( महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेकडे) केंद्र व राज्य शासनाचा हिस्सा सुपूर्द केल्यानंतर केंद्र शासन राज्य शासनाला पुढील हप्ता मंजूर करील.

इ) सर्व शिक्षण मोहिमेअंतर्गत नियुक्त केलेल्या शिक्षकांच्या वेतनावरील केंद्र व राज्य शासनाचा खर्चाचा हिस्सा नवव्या पंचवार्षिक योजनेत ८५ : १५, दहाव्या पंचवार्षिक योजनेत ७५ : २५ व त्यानंतर ५० : ५० याप्रमाणे राहील.

फ) बाह्यसहाय्यित प्रकल्पाबाबत केलेले करार यापुढेही तसेच अंमलात राहतील. तथापि संबंधित बाह्य संस्थांशी सल्लामसलत करुन विशिष्ट सुधारणा त्यात करता येईल.

ग ) प्राथमिक शिक्षणाशी संबंधित ( राष्ट्रीय बालभवन आणि राष्ट्रीय शिक्षक प्रशिक्षण संस्था यांच्याशी संबंधित योजना वगळता) सर्व योजना नवव्या पंचवार्षिक योजनेनंतर एकत्रित राहतील.

ह) जवाहर रोजगार योजना, पंतप्रधान ग्रामीण योजना, सुनिश्चित रोजगार योजना, मा.आमदार आणि खासदार यांच्या क्षेत्रासाठी निधी, राज्य योजना, विदेशी सहाय्य आणि स्वयंसेवी संस्थांना मिळणारी साधनसामुग्री याचा जिल्हा प्राथमिक शिक्षण आराखड्यामध्ये स्पष्टपणे उल्लेख करण्यात येईल.

३. सर्व शिक्षण मोहिमेची अंमलबजावणी महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई या स्वायत्त संस्थेकडे सोपविण्यात येत आहे.

४. सर्व शिक्षण अभियान कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी जिल्हा स्तरावर पुढील प्रमाणे समित्या व उपसमित्या गठीत करण्यात येत आहेत :-

## जिल्हा समिती

जिल्हा समिती ही महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेची जिल्हा शाखा असेल, संबंधित जिल्हा परिषदेचे अध्यक्ष हे जिल्हा समितीचे पदसिद्ध अध्यक्ष असतील. जिल्हा परिषदेच्या सर्व विषय समित्यांचे सभापती, कार्यक्रमाशी संबंधित अधिकारी आणि कार्यक्रमाशी संबंधित संस्थांचे प्रतिनिधी जिल्हा समितीचे सदस्य असतील. अशासकीय सदस्यांची नियुक्ती जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अध्यक्षांच्या मान्यतेने करतील. जिल्हा परिषदेचे शिक्षणाधिकारी (प्राथमिक) हे जिल्हा समितीचे पदसिद्ध सदस्य सचिव असतील.

सर्व शिक्षण मोहिमेअंतर्गत जिल्हयात कार्यान्वित असलेल्या उपक्रमांच्या प्रगतीचा आढावा घेणे आणि उपक्रमांशी संबंधित संस्था आणि व्यक्तिंचा कार्यक्रमातील सहभाग वाढविणे ही जिल्हा समितीची प्रमुख कामे असतील.

## जिल्हा कार्यकारिणी

कार्यक्रमांच्या अंमलबजावणीसंबंधीचे निर्णय घेण्याचे सर्व अधिकार जिल्हा कार्यकारिणी समितीला असतील. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी या समितीचे पदसिध्द अध्यक्ष असतील. शिक्षणाधिकारी, (प्राथमिक) जिल्हा परिषद हे पदसिद्ध सदस्य सचिव असतील. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा समितीच्या अध्यक्षांच्या मान्यतेने जिल्हा समितीवरील सदस्य, कार्यक्रमाशी संबंधित अधिकारी आणि संस्थाचे प्रतिनिधी यांची जिल्हा कार्यकारीणीवर नियुक्ती करतील. जिल्हा कार्यकारिणी वरील समिती सदस्यांची एकूण संख्या १५ पर्यंत राहील.

याशिवाय जिल्हा स्तरावर पुढील उपसमित्या असतील :-

## बांधकाम उपसमिती

अध्यक्ष, जिल्हा परिषद

मुख्य कार्यकारी अधिकारी

शिक्षणाधिकारी (प्राथमिक)

कार्यकारी अभियंता (सार्वजनिक बांधकाम)

सभापती (बांधकाम जिल्हा परिषद)

सर्व शिक्षण मोहिमेअंतर्गत करावयाच्या बांधकामाविषयीचे निर्णय घेण्याचे पूर्ण अधिकार बांधकाम समितीला राहतील.

## खरेदी उपसमिती

अध्यक्ष, जिल्हा परिषद.

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.

सभापती, शिक्षण समिती.

शिक्षणाधिकारी (प्राथमिक)

**विद्या उपसमिती**

शिक्षणाधिकारी (प्राथमिक).

जिल्हा समितीचे दोन सदस्य (यांची नियुक्ती अध्यक्ष, जिल्हा परिषद हे करतील.)

जिल्हयातील सर्व अध्यापक विद्यालयाचे प्राचार्य.

कार्यकारिणीने नियुक्त केलेले दोन सदस्य.

स्वयंसेवी संस्थांचा एक प्रतिनिधी. (यांची नियुक्ती शिक्षणाधिकारी (प्राथमिक) हे करतील.)

या सर्व समित्यांचे व उपसमित्यांचे काम महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेने तयार केलेल्या नियमावलीनुसार चालेल. याबाबत महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेने सर्व जिल्हयांना सविस्तर सूचना निर्गमित कराव्यात.

५. हा शासन निर्णय, नियोजन विभाग व वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक ४८५/अस-६, दिनांक १५.१२.२००१ नुसार मिळालेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

संगणक संकेतांक क्र. २००१०२१३१६५८३५००१

निर्गमित

दिनांक २८/१/२००२

( ज.मो.फाटक)
सचिव, शालेय शिक्षण.

प्रति,

शिक्षण संचालक (प्राथमिक शिक्षण), महाराष्ट्र राज्य. पुणे.
शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्चमाध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
शिक्षण संचालक (प्रौढ शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे.
संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.
संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.
सर्व विभागीय आयुक्त.
सर्व आयुक्त, महानगरपालिका.
सर्व जिल्हाधिकारी.
सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक,
मुख्य कार्यकारी अधिकारी, सर्व जिल्हा परिषदा
सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषदा
प्राचार्य, सर्व अध्यापक विद्यालये.
शिक्षणाधिकारी/प्रशासन अधिकारी/नगरपालिका/नगर परिषदा/ महानगरपालिका.